# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक -३ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.०८** | **विषय क्रमांक - ०८**

दिनांक : ०६/०२/२०२४ | विभाग : आस्थापना विभाग

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - ०८<br>दिनांक<br>०६/०२/२०२४ | अग्निशमन व सुरक्षा (फायर अँण्ड सेफ्टी) कोर्ससाठी ठराव पाठविणेबाबत... |
| ठराव क्रमांक - ०८<br>दिनांक<br>०६/०२/२०२४ | वरिल विषयांकीत मा.विभागीय संचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, नाशिक केंद्र यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक २४९ दिनांक ३१/०५/२०२३ अन्वये पत्र देवून संस्थेमार्फत अग्निशमन व सुरक्षा हा ६ महिने कालावधीचा कोर्स जानेवारी व जुलै अशा वर्षातुन दोन बॅचेस मध्ये चालविला जातो यामध्ये थेअरी प्रशिक्षण व क्षेत्रीय प्रात्यक्षिक करुन अंतिम परीक्षा घेतली जाते व यातुन उत्तीर्ण झालेले विद्यार्थी फायरमन या पदासाठी पात्र ठरतात. मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी दिनांक ०९ मार्च, २०२३ च्या आदेशात नमुद केल्याप्रमाणे सर्व ३८३ नगरपालिकांसाठी फायरमन या पदाच्या नियुक्ती / नेमणूकीसाठी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील कोर्स उत्तीर्ण असावा अशी पात्रता विहित केलेली आहे. फायरमन या पदासाठी आवश्यक शेक्षणिक पात्रता यामध्ये अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडी कोर्स उत्तीर्ण असावा अशी मंजूरी महासभेची घेवून सदरचा प्रस्ताव मा.शासनास सादर करणेसाठी मा.प्रशासकीय महासभेची मंजूरी आवश्यक आहे.<br>तरी अहमदनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियमावलीस दिनांक ०६/०२/२०१६ नुसार शासन यांनी संचालक, अग्निशमन संचालनालयाकडुन विहीत करण्यांत येणारी अर्हता याप्रमाणे नियम नमुद आहे त्यानुसार आस्थापना विभागाने संचालक, अग्निशमन संचालनालय, यांचेकडेस मार्गदर्शन मागवावे यास मा.प्रशासक यांची मंजूरी देण्यांत येत आहे. |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

सही/-
**(मेहेर लहारे)**
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

सही/-
**(डॉ.पंकज जावळे)**
प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक -३ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.०९** **विषय क्रमांक - ०९**

दिनांक : ०६/०२/२०२४ विभाग : नगररचना विभाग

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - ०९ दिनांक ०६/०२/२०२४ | Excision Civil Area of Cantonments<br>**संदर्भ : शासनाच्या नगर विकास विभाग यांचे कडील पत्र क्र.संकिर्ण-2022/प्र.क्रं.209/नवि-20 दिनांक 27 मार्च,2023** |
| ठराव क्रमांक - ०९ दिनांक ०६/०२/२०२४ | वरिल विषयांकित शासनाने भिंगार कॅन्टोन्मेंट बोर्डाचे सध्याचे क्षेत्र व लोकसंख्या हे महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ठ करणे करीता भिंगार कॅन्टोन्मेंट, अहमदनगर या विभागाची मागविलेली माहिती खालील प्रमाणे.<br>१) भिंगार कॅन्टोन्मेंट बोर्ड एकुण लोकसंख्या - २८९८६ सन २०११ चे जनगणनेनुसार. २) भिंगार कॅन्टोन्मेंट बोर्ड एकुण क्षेत्रफळ- १३.१७ चौ.कि.मी., ३) अहमदनगर महानगरपालिका क्षेत्राची लोकसंख्या ३,४६,७५५ सन २०११ चे जनगणनेनुसार ४) अहमदनगर महानगरपालिका एकुण क्षेत्रफळ - ६८.३२ चौ.कि.मी., ५) कॅन्टोन्मेंट बोर्ड व महानगरपालिका यांचे मिळून एकत्रित लोकसंख्या ३,७५,७४१ सन २०११ चे जनगणनेनुसार, ६) कॅन्टोन्मेंट बोर्ड व महानगरपालिका मिळून एकुण होणारे क्षेत्रफळ - ८१.४९ चौ.कि.मी.<br>उपरोक्त प्रमाणे कॅन्टोन्मेंट व अहमदनगर महानगरपालिकेची माहिती असुन सदर कॅन्टोन्मेंट बोर्डाचा एरीया अहमदनगर महानगरपालिकेत समाविष्ठ करावे किंवा कसे याबाबत प्रशासकीय स्तरावर निर्णय होणे आवश्यक आहे अशी बाब असली तरी मा.शासनाचे निर्देशानुसार भिंगार कॅन्टोन्मेंट बोर्डचे क्षेत्र महानगरपालिका हद्दीत समावेश करण्याबाबत त्यांच्या सध्याच्या मत्ता व दायित्व यासह संपूर्ण हस्तांतरीत करणे योग्य राहील. यास मा.प्रशासकीय महासभेची मंजूरी आवश्यक आहे.<br>तरी जा.क्रं.नगररचना ३७०७ दिनांक ०५/०२/२०२४ अन्वये बाबतचा संपूर्ण अहवाल उपलब्ध करुन तसा प्रस्ताव तयार करुन मा.महासभेकडे फेरसादर करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देण्यांत येत आहे. |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

सही/-
**(मेहेर लहारे)**
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

सही/-
**(डॉ.पंकज जावळे)**
प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक -३ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१०** **विषय क्रमांक - १०**

दिनांक : ०६/०२/२०२४ विभाग : कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - १०<br>दिनांक<br>०६/०२/२०२४ | **कै.बा.दे.दवाखाना येथे जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम या योजने अंतर्गत मोफत आहार योजनेचे प्रलंबित देयके महिला व बालकल्याण समिती जननी शिशु सुरक्षा योजना या लेखाशिर्षातुन अदा करणे बाबत...** |
| ठराव क्रमांक - १०<br>दिनांक<br>०६/०२/२०२४ | वरिल विषयांकित कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे जननी शिशु सुरक्षा योजना अंतर्गत मोफत आहार योजनेकरीता आहार पुरविणेच्या कामाचा ठेका क्रांती विकास महिला मंडळ यांना देण्यांत आलेला होता. सदर संस्थेने दिनांक ०१ एप्रिल, २०१६ रोजीचे देयक मिळणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे. कागदपत्रांची पडताळणी केली असता सदर संस्थेने दिनांक २८/१०/२०२० रोजी उशीराने अर्ज केल्याचे निदर्शनास येते. सदर अर्जानुसार कार्यवाही होण्यास विलंब झाल्याने संबंधित लिपीक यांचेवर दप्तर दिरंगाई बाबत चौकशी प्रस्तावित करण्यांत आलेली आहे. क्रांती विकास महिला मंडळ, अहमदनगर यांचे माहे एप्रिल, २०१६ चे देयक रक्कम रु.९१,६८५/- हे ७ वर्षापुर्वीचे असल्याने सदर देयक महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता २०११ मधील नियम १६८ ने महासभेच्या मंजुरीशिवाय अदा करता येणार नाही. याकरीता सदर देयक अदा करण्यांस मा.प्रशासकीय महासभेची मंजूरी आवश्यक आहे.<br>तरी जा.क्रं.सा.प्र.वि.६८४ /२०२३-२०२४ दिनांक ०३/०१/२०२४ च्या आदेशा नुसार व मुलेप यांचे दि.१६/१०/२०२३ चे शेरांकनानुसार यापुर्वी सदर देयक अदा झाले नाही व विलंब झाल्याच्या कारणासह फेर प्रस्ताव सादर करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देण्यांत येत आहे. |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

सही/-
**(मेहेर लहारे)**
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

सही/-
**(डॉ.पंकज जावळे)**
प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक -३ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.११** **विषय क्रमांक - ११**

दिनांक : ०६/०२/२०२४ विभाग : बांधकाम विभाग

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - ११ दिनांक ०६/०२/२०२४ | **महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास योजना अंतर्गत कामांना प्रशासकीय मान्यता मिळणेकामी प्रशासकीय मा.महासभेची मंजूरी मिळणे बाबत.** |
| ठराव क्रमांक - ११ दिनांक ०६/०२/२०२४ | वरिल विषयांकित उक्त योजने अंतर्गत खालील नमुद कामे प्रस्तावित केली आहेत सार्वजनिक बांधकाम विभाग अहमदनगर ही कार्यन्वयन संस्था असुन सदर कामे करण्यासाठी अहमदनगर महानगरपालिकेचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळणे बाबत कळविले आहे. त्यानुसार ना-हरकत देण्यांत आलेली आहे तथापि सदर कामे मंजूर करण्यासाठी अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.प्रशासकीय महासभेची मंजूरी आवश्यक आहे.<br>१) डी.पी.रस्ता ते लिंकरोड व साईनगर ते पोतदार शाळा रस्ता मंजबुतीकरण व डांबरीकरण करणे.<br>२) गायके मळा ते लिंकरोड आणि अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.<br>तरी उक्त कामांना प्रशासकीय मंजूरीसाठी मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस सादर करणेस मा. प्रशासक यांची मंजूरी देण्यांत येत आहे. |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

**(मेहेर लहारे)**
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

**(डॉ.पंकज जावळे)**
प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक -३ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१२** | **विषय क्रमांक - १२**

दिनांक : ०६/०२/२०२४ | विभाग : क्रीडा विभाग

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - १२ दिनांक ०६/०२/२०२४ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील खाली नमूद केलेल्या ओपन जिमचे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी, अहमदनगर यांचेकडे सादर करणे बाबत.... |
| ठराव क्रमांक - १२ दिनांक ०६/०२/२०२४ | वरिल विषयांकीत डॉ.सुजय राधाकृष्ण विखे पाटील संसद सदस्य, (लोकसभा) अहमदनगर लोकसभा मतदार संघ (महाराष्ट्र) यांनी पत्रान्वये कळविलेनुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील खालील नमुद केलेल्या ओपन जिमचे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी, अहमदनगर यांचेकडेस सादर करणेच्या प्रस्तावास मा.प्रशासकीय महासभेची मंजूरी आवश्यक आहे, |

| अ.क. | संस्थेचे नांव | प्रयोजन |
|---|---|---|
| ०१ | प्रभाग क्रमांक ०२ मधील सावली हौसिंग सोसायटी, स्वामी समर्थ मंदिर जवळ, सावेडी, अहमदनगर | खुली व्यायाम शाळा |
| ०२ | प्रभाग क्रमांक ०२ छत्रपती संभाजी नगर रोड, अहिल्या गृहनिर्माण संस्थेमधील शिंदे घरासमोरील ओपन स्पेस, अहमदनगर | खुली व्यायाम शाळा |
| ०३ | प्रभाग क्रमांक ०२ सुर्यनगर एस.टी.कॉलनी, सावेडी अहमदनगर येथील ओपन स्पेस | खुली व्यायाम शाळा |
| ०४ | प्रभाग क्रमांक ०७ मधील मनोलिला नगर मारुती मंदीर शेजारील ओपन स्पेस, बोल्हेगांव, अहमदनगर. | खुली व्यायाम शाळा |
| ०५ | प्रभाग क्रमांक ०५ वरद रेसिडेन्सी आगरवाल हॉस्पीटल जवळ सावेडी, अहमदनगर | खुली व्यायाम शाळा |
| ०६ | प्रभाग क्रमांक ०४ मॉडेल/ अभियंता कॉलनी समोरील, अहमदनगर येथील ओपन स्पेस | खुली व्यायाम शाळा |
| ०७ | प्रभाग क्रमांक ०२ मधील वीर सावरकर मार्ग येथील संभाजी महाराज उद्यान | खुली व्यायाम शाळा |

तरी सदर प्रस्तावात नमुद ओपन स्पेसची क्रीडा विभागाने स्थळ पाहणी करुन त्याबाबत अहवाल तयार करुन ओपन जीमचा प्रस्ताव मा.जिल्हाक्रीडा अधिकारी, अहमदनगर यांचेकडेस प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देण्यांत येत आहे.

| | |
|---|---|
| | -२- |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

सही/-
**(मेहेर लहारे)**
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

सही/-
**(डॉ.पंकज जावळे)**
प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.